महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९६

# मुंबई सहाय्यक उपक्रम [खास उपबंध] अधिनियम, १९५८

[दिनांक ३१-३-१९८३ पर्यंत सुधारलेला]

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
१९८७

[किमत १ रुपया]

# मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे. पृष्ठ

१. संक्षिप्त नाव व व्याप्ति. १

२. व्याख्या. २

३. सहाय्यक उपक्रम जाहीर करणे. २

४. सहाय्यक उपक्रमासाठी औद्योगिक संबंध व इतर सवलती तात्पुरत्या विहित करण्याचा अधिकार. २

अनुसूची ५

# १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९६[१]

## [मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८]

(२ डिसेंबर १९५८)

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये, अनुकूलन रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

१९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १.*

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

१९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.[२]

१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

[३][बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा बेकारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना म्हणून विवक्षित औद्योगिक उपक्रम चालविणे किंवा ते चालविण्यासाठी कर्ज देणे, हमी देणे किंवा वित्तीय सहाय्य देणे]. राज्य शासनास शक्य व्हावे यासाठी, औद्योगिक संबंध व इतर बाबी याविषयी तात्पुरते उपबंध करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, [३][बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा बेकारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना म्हणून विवक्षित औद्योगिक उपक्रम चालविणे किंवा ते चालविण्यासाठी कर्ज देणे, हमी देणे किंवा वित्तीय सहाय्य देणे] राज्य शासनास शक्य व्हावे यासाठी, औद्योगिक संबंध व इतर बाबी याविषयी तात्पुरते उपबंध करणे इष्ट आहे, त्याअर्थी, याद्वारे, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व व्याप्ति.

१. (१) या अधिनियमास, मुंबई सहाय्यक उपक्रम (विशेष उपबंध) अधिनियम, १९५८ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण [४][महाराष्ट्र राज्यास] लागू होईल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५८ भाग पाच, पृष्ठे २०६ व २०७ पहा (इंग्रजी).

*सन १९५९ चा मुंबई अध्यादेश क्रमांक ५ हा, सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

२. सन १९६४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा, सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

३. "बेकारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना म्हणून औद्योगिक उपक्रम चालविणे" या मजकुरा-ऐवजी हा मजकूर सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलमे २ व ३ अन्वये दाखल करण्यात आला.

४. "मुंबई राज्य" या शब्दांऐवजी हे शब्द महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे दाखल करण्यात आले.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(१) "उद्योग" म्हणजे, मालकांचा कोणताही धंदा, व्यापार, उपक्रम, वस्तुनिर्मिती किंवा आजीविका आणि त्यात, कामगारांची कोणतीही उपजीविका, सेवा, नोकरी, हस्तकौशल्य किंवा औद्योगिक व्यवसाय यांचा समावेश होतो आणि "औद्योगिक" या शब्दाचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल.

(२) "सहाय्यक उपक्रम" म्हणजे, कलम ३ खालील घोषणा ज्याच्या संबंधात अंमलात असेल तो औद्योगिक उपक्रम.

सहाय्यक उपक्रम जाहीर करणे. ३. (१) राज्य शासनास कोणत्याही वेळी तसे करणे आवश्यक वाटेल तर, त्यास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेला जो औद्योगिक उपक्रम—मग तो राज्य शासनाने सुरू केलेला, संपादन केलेला किंवा इतर रितीने ताब्यात घेतलेला असो—राज्य शासन स्वतः किंवा आपल्या प्राधिकाराखाली चालवीत असेल, [1][किंवा ज्यास राज्य शासनाने कोणतेही कर्ज, हमी किंवा इतर वित्त सहाय्य दिले असेल] किंवा तो चालविण्याचे त्याने योजिले असेल तो उपक्रम, उक्त अधिसूचनेत त्या प्रयोजनासाठी निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून [2][बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा] बेकारीचे निवारण करण्यासाठीची उपाययोजना म्हणून [3][चालविण्यात येईल], आणि उक्त उपक्रम हा त्यानुसार, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी सहाय्यक उपक्रम आहे असे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना, उक्त अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे बारा महिन्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या मुदतीपर्यंत अंमलात असेल, परंतु अशा अधिसूचनेची मुदत तत्सम अधिसूचनांद्वारे, एका वेळी [4][बारा महिन्यांपेक्षा] अधिक नाही इतक्या मुदतीपर्यंत वाढविता येईल, परंतु एकूण मुदत [5][पंधरा वर्षांपेक्षा] अधिक असणार नाही.

सहाय्यक उपक्रमासाठी औद्योगिक संबंध व इतर सवलती तात्पुरत्या विहित करण्याचा अधिकार. ४. (१) कोणताही कायदा, रिवाज, रूढी, करार, लेख, हुकूमनामा, आदेश, निवाडा, विनंती-अर्ज, तडजोड, स्थायी आदेश किंवा इतर कोणतीही तरतूद असली तरीही, राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देता येईल: —

(अ) कोणत्याही सहाय्यक उपक्रमासंबंधात व ज्या मुदतीपर्यंत तो उपक्रम कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये सहाय्यक उपक्रम म्हणून चालू राहील त्या मुदतीच्या बाबतीत,—

(एक) ह्या अधिनियमाच्या अनुसूचीतील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही कायदे किंवा त्यांच्या कोणत्याही तरतुदी लागू असणार नाहीत [आणि असा सहाय्यक उपक्रम त्यातून वगळण्यात येईल] किंवा, राज्य शासनाने तसा निदेश दिल्यास, ते, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरफारांसह [तथापि, त्यामुळे उक्त कायद्याच्या धोरणास बाध येणार नाही] लागू होतील.

(दोन) ह्या अधिनियमाच्या अनुसूचीतील कायद्यांपैकी कोणत्याही कायद्यान्वये केलेले जे करार, तडजोडी, निवाडे किंवा स्थायी आदेश शासनाने तो उपक्रम सहाय्यक उपक्रम म्हणून संपादन

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ (१) (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४ (१) (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ (१) (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] "सहा महिन्यांपेक्षा" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ४ (२) (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[5] "दहा वर्षांपेक्षा" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

करण्याच्या किंवा आपल्या ताब्यात घेण्याच्या लगतपूर्वी [1][किंवा त्यास राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाच्या संमतीने, कोणतेही कर्ज, हमी किंवा इतर वित्त सहाय्य दिले जाण्याच्या लगतपूर्वी], त्या उपक्रमास लागू असतील ते सर्व किंवा त्यापैकी कोणतेही करार, तडजोडी, निवाडे किंवा स्थायी आदेश, यांचे प्रवर्तन निलंबित करण्यात येईल किंवा, राज्य शासनाने तसा निदेश दिल्यास, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरफारांसह, लागू होतील.

(तीन) हक्क, विशेषाधिकार, बंधने व दायित्वे खंड (एक) व (दोन) आणि अधिसूचना यांस अनुसरून ठरविण्यात येतील व अंमलात आणता येतील,

(चार) उक्त उपक्रम हा, सहाय्यक उपक्रम म्हणून जाहीर करण्यापूर्वी, प्राप्त झालेला हक्क, विशेषाधिकार किंवा बंधन किंवा पत्करलेले दायित्व व त्यांच्या अंमलबजावणीसाठीची कोणतीही उपाययोजना निलंबित होईल आणि कोणत्याही न्यायालयापुढे, न्यायाधिकरणापुढे, अधिकाऱ्यांपुढे किंवा प्राधिकाऱ्यांपुढे अनिर्णित राहिलेले त्या संबंधीचे कोणतेही कामकाज स्थगित करण्यात येईल ;

(ब) खंड (अ) (चार) मध्ये उल्लेखिलेला हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा दायित्व हे अधिसूचना अंमलात असण्याचे बंद झाल्यावर, पुनः प्रवर्तित होईल व अंमलात आणता येईल आणि त्यात उल्लेखिलेले कामकाज चालू ठेवण्यात येईल:

परंतु त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, असा हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा दायित्व यांच्या अंमलबजावणीसाठीची मुदत मोजताना, ज्या कालावधीत खंड (अ) (चार) अन्वये उक्त हक्क इत्यादि निलंबित करण्यात आले होते तो कालावधी वगळण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना तीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून अंमलात येईल. अशी तारीख, कलम ३, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या तारखेच्या आधीची असणार नाही आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २१ चे उपबंध अशी अधिसूचना काढण्याच्या अधिकारास लागू होतील. १९०४ चा मुंबई १.

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

## अनुसूची

### केंद्रीय अधिनियम

१. औद्योगिक नोकरी (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६ (१९४६ चा २०).
२. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४).

### मुंबई अधिनियम

३. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ (१९४७ चा मुंबई ११).
४. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई ७९).

### मध्यप्रदेश अधिनियम

५. मध्यप्रांत व वन्हाड दुकाने व संस्था अधिनियम, १९४७ (१९४७ चा मध्यप्रांत व वन्हाड २२).
६. मध्यप्रांत व वन्हाड औद्योगिक विवाद तडजोड अधिनियम, १९४७ (१९४८ चा मध्यप्रांत व वन्हाड २३).

[1]* * * * * *

### हैद्राबाद अधिनियम

८. हैद्राबाद दुकाने व संस्था अधिनियम, १९५१ (१९५१ चा हैद्राबाद १०).

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग.

---

[1] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये नोंद क्रमांक ७ वगळण्यात आली.

मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८

(१९५८ चा मुंबई ९६)

यात वापरलेले काही विशेष पर्याय

| | | |
|---|---|---|
| Agreement | .. | करार |
| Award | .. | निवाडा |
| Calling | .. | आजीविका |
| Contract | .. | करार |
| Custom | .. | रूढी |
| Decree | .. | हुकूमनामा |
| Instrument | .. | लेख |
| Liability | .. | दायित्व |
| Obligation | .. | बंधन |
| Privilege | .. | विशेषाधिकार |
| Relief Undertaking | .. | सहाय्यक उपक्रम |
| Settlement | .. | तडजोड |
| Submission | .. | विनंती अर्ज |
| Usage | .. | रिवाज |

शामुना—ए-२०२३—संउकाविमुं—६-८७—८६५—पीए५*